# श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई

## मुंबई कार्यालय

## श्री देवी मंदिरात व इतर ठिकाणी श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समितीला दिल्या जाणाऱ्या चल मालमत्तेसंबंधी दिनांक २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर झालेली धोरणात्मक नियमावली.

### १. रोख व धनादेश व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून समितीच्या नावाने आलेल्या रकमा

संस्थेकडे आलेला निधी दात्यांच्या इच्छेनुसार निधीमध्ये वर्ग केला जाईल. काही मोठे खर्च उभे राहिल्यास किंवा प्रसंगानुरूप करावे लागल्यास, समितीचे कार्यकारी मंडळ विचारविनिमय करून या निधीमधील रकम असे खर्च करण्यासाठी वापरू शकेल. समितीची बँक खाती सध्या मुंबई, पाट, कुडाळ व केळूस या ठिकाणी आहेत. कोणत्या बँकेत व कोणत्या खात्यात आलेले धन ठेवावे याबाबत सचिव व खजिनदार कार्याध्यक्षांशी चर्चा करून निर्णय घेतील. मुदत ठेवी ठेवताना शेड्यूल्ड कमर्शिअल बँकेमध्ये प्राधान्याने ठेवल्या जातील.

### २. भांडी, कपाटे, फर्निचर, विद्युत रोषणाईचे सामान, संगीत वाद्ये वगैरे

सर्व भांडी, समई व निरांजने, सजावटीचे विद्युत सामान, संगीत वाद्ये, पलंग, रजई, सतरंज्या, गादी व चादरी भक्तनिवासात ठेवून त्यांचा प्रसंगानुसार वापर केला जाईल. तत्पूर्वी स्वीकारलेल्या वस्तूंची नोंद केली जाईल. या वस्तू जीर्ण झाल्यास अथवा वापरण्यायोग्य न राहिल्यास त्यांची विल्हेवाट / वासलात समितीची कार्यकारिणी वेळोवेळी निर्णय घेऊन करेल. याकामी पुरोहितांची  व स्थानिक सल्लागार समितीच्या कार्यकर्त्यांची मदत घेतली जाईल.

### ३. सुवर्ण (कोणत्याही कॅरेटचे), रूपे, रत्ने व हिरे, जवाहर व मौल्यवान खडे

सध्या समिती अलंकारांच्या स्वीकृतीबरोबर दात्याकडून खरेदीच्या पावत्या व घोषणापत्र घेते. यानंतर दागिने / अलंकार सेफ डिपॉझीट लॉकर मध्ये ठेवण्यात येतात. उत्सवप्रसंगी काही प्रमुख दागिने देवीला अलंकृत करण्यासाठी वापरले जातात आणि नंतर ते परत सेफ डिपॉझीट लॉकर मध्ये ठेवले जातात.

समितीला असे निदर्शनाला आले आहे की बऱ्याचदा दात्यांकडे दागिन्यांच्या मूळ पावत्या नसतात किंवा दागिने हे घरातील परंपरेने आलेले असतात. यास्तव समिती एक घोषणापत्र घेऊन दागिने स्वीकारते. सर्वसाधारणपणे समिती यापुढे खालील अलंकार स्वीकारताना पुढे दिलेली प्रक्रिया पार पाडेल.

अ. दात्याला दान करावयाच्या दागिन्यांची / वस्तूंची एक विस्तृत यादी (ज्यामध्ये वस्तूंची किंमत, प्रकार, संख्या इत्यादी) देण्यास सांगितली जाईल. उदाहरणार्थ सुवर्ण दान असल्यास सोने १८ कॅरेट आहे की २२ कॅरेट आहे की २४ कॅरेट आहे हे भक्ताला सांगावे लागेल. जर दागिन्यांमध्ये रत्नांचा अथवा मण्यांचा वापर केला गेला असेल, तर त्यांची संख्या व किंमत वर्णनासहित सांगावी लागेल. दात्याकडून सोबत जोडलेल्या नमुन्यात एक घोषणापत्र घेतले जाईल, ज्यात तीन गोष्टी अनुस्यूत असतील. १. दानाची इच्छा २. अटळ व रद्द न करता येणारे दानवस्तूचे हस्तांतरण ३. समितीने वस्तूचा केलेला स्वीकार मान्य करणे.

आ. दात्याने दिलेल्या घोषणापत्रामध्ये हे निर्विवादपणे मान्य केले पाहिजे की दात्याने दानवस्तुमधील आपले सर्व मालकी व इतर अधिकार श्री देवी चामुंडेश्वरीच्या नावे स्वखुशीने सोडून दिलेले आहेत व दानवस्तू देवीच्या वतीने कार्य करणाऱ्या श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई याना नित्य नियमाने अथवा सुयोग्य प्रसंगी देवीची मूर्ती सुशोभित दिसावी याजसाठी किंवा तत्सम कारणासाठी वापरण्यास दिले आहेत. दिलेल्या दानवस्तूची मालकी श्री देवीची असून सेवा समिती वस्तूचा ताबा श्री देवीच्या वतीने आणि तिच्या प्रीत्यर्थ सुरक्षित ठेवण्यासाठी व प्रसंगानुरूप वापर करण्यासाठी घेत आहे.

इ. दात्याचे घोषणापत्र प्राप्त झाल्यावर समितीचे खजिनदार सचिवांच्या सहीनिशी समितीच्या अध्यक्षांना देवीसाठी प्राप्त होणारे मौल्यवान वस्तूंचे दान स्वीकारण्यासंबंधी लेखी कळवतील. अध्यक्षांची परवानगी मिळाल्यावर दात्याला आधी कळवून दागिने समितीच्या मुंबई कार्यालयात अथवा दाता आणि समितीने ठरविलेल्या ठिकाणी स्वीकारले जातील. यासंदर्भातील पत्रव्यवहार लेखी किंवा इ मेल द्वारा होईल.

ई. समितीला दागिने खरेदीच्या मूळ पावत्या देणे आवश्यक आहे किंवा जर अशा पावत्या उपलब्ध नसतील तर दागिन्यांच्या किमतीबद्दल उल्लेख घोषणापत्रात असणे आवश्यक आहे.

उ. दान केलेले अलंकार व इतर मौल्यवान वस्तू वापरावयाच्या की नाही व कधी वापरायच्या याबाबत समिती अंतिम निर्णय घेईल व तो दात्यावर बंधनकारक राहील.

ऊ. समिती दिलेल्या दानवस्तूंची अनुभवी मूल्यनिर्धारकांकडून सत्यता व किमतीसंबंधात पडताळणी करेल व असे निर्धारित केलेले मूल्य लेखा प्रविष्टी साठी गृहीत धरले जाईल.

ऋ. दात्याने सूचित केलेली किंवा पावती नुसार गृहीत धरलेली रकम आणि मुल्यनिर्धारकाने दिलेल्या मुल्याकंनमध्ये फरक असल्यास मूल्यनिर्धारकाने दिलेले मूल्यांकन प्रमाण मानले जाईल.

ऌ. दानवस्तू सेफ डीपॉझीट लॉकर मध्ये ठेवल्या जातील. हे कार्य समिती अगत्याने लवकरात लवकर करेल.

ऍ. मूल्यनिर्धारकांचे शुल्क हे दात्याला सोसावे लागेल. मात्र अध्यक्ष व कार्याध्यक्ष वेळप्रसंगी अधिकाराचा वापर करून असे शुल्क समितीच्या खात्यातून खर्च करू शकतात.

## सुवर्णादि अलंकार, रूपे, हिरे, रत्ने व इतर मौल्यवान खडे व धातू दान देणाऱ्या दात्यांकडून घेतल्या जाणाऱ्या घोषणापत्राचा नमुना

**प्रति**

**श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती,**
**इ/५ आणि सी/२, सह्यगिरी को हौ सो**
**सोनावाला लेन, गोरेगाव पूर्व**
**मुंबई ४०० ०६३**

सन्माननीय समिती सभासद,

मी/आम्ही ___________________________ राहणार _________ येथे आमचे खालील वर्णनाचे दागिने / अलंकार / हिरे /मोती /रत्ने/मौल्यवान खडे हे महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील आंदुर्ले गांवी स्थित श्री देवी चामुंडेश्वरी मंदिरातील श्री देवी चामुंडा मातेला दान करीत आहोत. आम्ही या वस्तूंचे कायदेशीर मालक असून या वस्तूंवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही व या वस्तुसंदर्भात कोणीही व्यक्ती किंवा संस्थेने हक्क सांगितला नसून कोणताही खटला व वाद पूर्वी किंवा आता झालेला नाही. आम्ही या दानवस्तूवरील आमचे सर्व अधिकार श्री देवी चामुंडा हिच्या चरणी समर्पित केलेले आहेत. भविष्यात कोणी या वस्तूंवर अधिकार सांगितल्यास किंवा या वस्तुंचा ताबा घेण्यासाठी समितीवर कायदेशीर कारवाई केल्यास आम्ही समितीला होणारी तोशीस व नुकसान स्वखर्चाने भरपाई करून देऊ. यात समितीला झालेला कोर्ट खर्च व बदनामी मुळे झालेले नुकसान ही सामील असेल.

**या दागिन्यांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

| अनुक्रमांक | अलंकार / वस्तूचे नाव | वर्णन | वजन | खरेदीवेळी दिलेली किंमत | सध्याची अंदाजे किंमत | पावतीची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(लागू पडत असल्यास) मी / आम्ही जाहीर करतो की उपरिनिर्दिष्ट अलंकार/वस्तू/दागिने/मौल्यवान धातू हे आमच्या कुटुंबाची परंपरागत ठेव असून त्यांच्या खरेदीच्या पावत्या आता उपलब्ध नाहीत. आम्हाला या वस्तूंच्या सत्यतेबाबत खात्री आहे.

आम्ही जाणून आहोत की समिती ने ह्या अलंकार / दागिने / वस्तू / मौल्यवान धातूंचा ताबा श्री देवी चामुंडेश्वरीच्या वतीने घेतलेला आहे व समिती ह्या वस्तूंचा वापर देवी मूर्ती सुशोभित करण्यासाठी वेळोवेळी किंवा विवक्षित वेळी व त्यांच्या इच्छेनुसार करेल आणि या बाबतीत समितीचा निर्णय अंतिम राहील. आम्ही ह्या वस्तुंना प्रवासादरम्यान अथवा पूर, आग, भूकंप, अपघात, डाका, दंगल, चोरी, केंद्र/राज्य/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी केलेली कारवाई,

न्यायालयीन आदेश अथवा हाताळणीदरम्यान झालेले नुकसान यासाठी समिती अथवा तिच्या सभासदांना दोषी धरणार नाही.

मी/आम्ही मान्य करतो की समिती मी/आम्ही दान केलेल्या वस्तूंचे त्यांनी ठरविलेल्या मूल्यनिर्धारकांकडून मूल्यांकन करून घेईल. अशा मूल्यनिर्धारकाने निर्धारित केलेले मूल्य हे या वस्तूंचे मूल्यांकनाच्या दिवसाचे सुयोग्य मूल्य समजले जाईल. आम्ही अशा मूल्यांकनाचा विरोध करणार नाही किंवा हे मूल्यांकन मान्य नसल्यास दानवस्तू परत मागणार नाही. आम्हाला कल्पना आहे की समिती हे दागिने व इतर दानवस्तू मूल्यनिर्धारकांने केलेल्या मूल्यांकनानुसार त्यांच्या ताळेबंदामध्ये चल मालमत्ता यात अंतर्भाव करून उल्लेख करतील व माझा / आमचा त्याला कोणताही आक्षेप नाही. समितीने लेखी अथवा इ-मेल द्वारा विनंती केल्यास आम्ही मूल्यांकनाचा खर्च समितीला भरून देऊ.

स्थान सही

नाव

तारीख पूर्ण पत्ता / भ्रमणध्वनी / दूरध्वनी / इ-मेल